# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

## नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

## (पोलीस वार्तापत्र)

## सायंकाळ

---

### दिनांक 13.02.2018 मंगळवार

### (गुन्हे)

**1) पो.स्टे. सदर – अपहार करणा–या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल :**

दि. 12.02.18 चे 1830 वा चे सुमारास फिर्यादी हर्षल सुरेश बनकर, वय 22 वर्ष, रा. ए 403, एनआयटी कॅम्प, आयुर्वेदीक लेआउट, नागपूर यांनी आपली पल्सर दुचाकी गाडी क्र. एमएच/49/एडी/0330 हि विकण्यासाठी ओएलेक्स ॲपवर टाकले असता मोबाईल क्र. 9644916067 चा आरोपी धारकाने फिर्यादीस फोन करून दुचाकी विकत घेण्याचे सांगितले व फिर्यादीस गाडी घेवून बोलवीले फिर्यादी पो.स्टे. सदर हद्यीत रेसीडेंसी रोड, स्मृती टॉकीज समोर आले असता आरोपीने फिर्यादीस गाडीची टेस्ट ड्राईव्ह घेतो असे म्हणुन गाडी घेवून जावून अपहार केला. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पो.स्टे. सदर येथे मपोउपनि पी. कुळमेथे, 9970531850 यांनी आरोपीविरूध्द कलम 406 भादंवि अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

**2) पो.स्टे. कोतवाली – पळवून नेणा–या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल :**

दि. 12.02.18 चे 1700 वा चे सुमारास पो.स्टे. कोतवाली हद्यीत शिवाजी नगर, बौध्दविहार जवळ, नागपूर येथे राहणा–या फिर्यादी सौ. लता चंद्रभान पठाडे, वय 34 वर्ष, यांचा 12 वर्षीय अल्पवयीन मुलगा अथर्व हा कोणाला काही न सांगता घरून निघुन गेला. परत आला नाही. शोध घेतला असता मिळून आला नाही. बेपत्ता आहे. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून व मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देशानुसार पो.स्टे. कोतवाली येथे पोहवा दिपक लांजेवार, 9764004166 यांनी कलम 363 भादंवि अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

### (अकस्मात मृत्यु)

**पो.स्टे. एमआयडीसी, पाचपावली, गणेशपेठ :**

**1) एमआयडीसी** – दि.13.02.18 चे 0830 वा चे सुमारास पो.स्टे. एमआयडीसी हद्यीत राय टाऊन, फ्लॅट नं 301, थर्ड फ्लोअर, हिंगणा रोड, नागपूर येथे राहणा–या सौ. मालविका निर्मल चटर्जी, वय 31 वर्ष, यांनी आपल्या राहते घरी बेडरूम मध्ये सिलींग फॅनला ओढणीच्या सहायाने गळफास लावून आत्महत्या केली. याप्रकरणी फिर्यादी निर्मल रंजीत चटर्जी, वय 36 वर्ष, यांनी दिलेल्या सुचनेवरून पो.स्टे. एमआयडीसी येथे पोहवा कौडुजी, 9011188425 यांनी अकस्मात मृत्युची नोंद केली आहे.

**2) पाचपावली** – दि. 21.01.18 चे 1030 वा चे सुमारास पो.स्टे. पाचपावली हद्यीत लालगंज, पोलीस चौकी मागे, नागपूर येथे राहणा–या सौ. पिंकी संतोष वानखेडे, वय 35 वर्ष, यांनी आपल्या राहते घरी स्वतःचे अंगावर रॉकेल टाकून जाळून घेतले. त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे भरती केले असता उपचारादरम्यान दि. 13.02.18 चे 1010 वा चे सुमारास डॉक्टरांनी तपासून मृत घोषीत केले. याप्रकरणी मिळालेल्या सुचनेवरून पो.स्टे. पाचपावली येथे पोहवा सारंग वैरागेड, 9823136796 यांनी अकस्मात मृत्युची नोंद केली आहे.

**3) गणेशपेठ** – दि. 13.02.18 चे 1500 वा चे सुमारास मुरलीधर आबाजी दातारकर, वय 98 वर्ष, रा. कॉटन मार्केट, जयश्री टॉकीजचे मागे, नागपूर यांना पो.स्टे. गणेशपेठ हद्दीत कॉटन मार्केट शंकर विलास मागे येथे बैलाने मारल्याने ते बेशुध्द अवस्थेत मिळून आले त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे नेले असता डॉक्टरांनी तपासून मृत घोषीत केले. याप्रकरणी मिळालेल्या सुचनेवरून पो. स्टे. गणेशपेठ येथे सपोउपनि प्रतापसिंग, यांनी अकस्मात मृत्युची नोंद केली आहे.

## (ईतर)

**1) गुन्हे शाखा, युनिट क. 3 पोलीसांची कामगीरी –**

गुन्हे शाखा युनीट क. 03 मधील अधिकारी कर्मचारी यांनी दिनांक 12/02/2018 रोजी रात्रगस्त दरम्यान मिळालेल्या गुप्तबातमीदारा मार्फत माहिती मिळाली की पो.स्टे. कळमणा हद्दीत काही ईसम प्राणघातक शस्त्र घेवून दरोडा टाकण्याचे तयारीत आहे. वरून छापा घालून आरोपी क. 1) शेख रमजान शेख जमील, वय 40 वर्षे रा. मिनीमाता नगर, पो.स्टे. कळमणा, नागपूर शहर, 2) कुलदीप उर्फ पैजामा सुभाष गणवीर, 23 वर्षे,रा. न्यु.कॉलोनी, भरतवाडा रोड, नागपूर शाळेजवळ, पो.स्टे. कळमणा, नागपूर, 3) राजेश धनराज कठाणे, वय 32 वर्षे,,रा. चिखली म्हाडा क्वॉर्टर नं. 180, पो.स्टे. कळमणा, नागपूर शहर, 4) सुर्यकांत उर्फ जगदीश उर्फ जग्गा मारोतराव पिसे,32 वर्षे, रा. गुलमोहर नगर, महालक्ष्मी कॉलोनी जवळ, पो.स्टे.कळमणा, नागपूर, 5) अनिल उर्फ बारीक क्रिष्णा शाहु, वय 19 वर्षे रा. विजयनगर, सावरकर लेआउट प्लॉट नं. 101, पो.स्टे. कळमणा, नागपूर, 6) जितेंद्र पुरषोत्तम कुर्रे वय 22 वर्षे गुलमोहरनगर भरतवाडा रोड, सुनील किराणा घराजवळ पो.स्टे. कळमणा, नागपूर शहर यांना प्राणघातक शस्त्रासह दरोडा टाकण्याचे तयारीत असताना पकडले त्यांचे कडून प्राणघातक शस्त्रांसह, महिंद्रा वाहन व शाईन मोटार सायकल असा एकुण 2,50,750/– रूपयांचा मुद्येमाल जप्त करण्यात आला त्याचेविरूध्द पो.स्टे. कळमणा येथे गुन्हा दाखल करण्यात आला.

**पो.स्टे. मौदा जि. नागपूर येथील अप.क. 66/18 कलम 457,454,380 चा गुन्हा उघडकीस**

वर नमुद कळमणा चे गुन्हयात आरोपींचा पीसीआर प्राप्त करून पीसीआरदरम्यान आरोपीतांकडे तपास करता त्यांनी उमरी फाटा NH 6 भंडारा रोड येथील प्रकाश गोयल यांचे गोडावून मध्ये DRI डिपार्टमेंट कडून 255 टन कस्टम डयुटी न भरल्याने जप्त करून सील करून ठेवलेली सुपारीपैकी 231 बोरी अं. 18 टन एकूण किं. 45,18,000 रू. चा मुद्येमाल सुपारी मागील 4 महिन्यापासून यातील अटक आरोपीतांनी वेळोवेळी चोरी केल्याचे व ते नागपूर शहरात विविध व्यापारांना विकल्याचे सांगीतले. नमुद गुन्हयाचे तपासात गुन्हे शाखा युनिट 3 यांनी चोरी गेलेल्या मालापैकी नागपूर शहरातील व्यापारी 1) सतिश लक्ष्मीनारायण केसरवाणी, वय 59 वर्षे, रा. लालगंज, नागपूर, 2) राहुल गजानन बावनकुळे, वय 28 वर्षे, रा. भारतनगर, कळमणा, नागपूर, एकूण सुपारीच्या 89 बोरी अं. एकूण किं. अं 17,33,720 रू. चा मुद्येमाल व चोरी करण्यासाठी वापरण्यात आलेले वाहने टाटा एस क. MH- 40-Y-2158 किं. 3,00,000 रूपये व महिंद्रा जितो क. MH- 49-D-6230 किं. 2,00,000 रूपये असा एकूण 22,33,720 रूपयांचा मुद्येमाल हस्तगत करण्यात आला असून गुन्हयातील मुद्येमाल व आरोपीस गुन्हयाचे पुढील तपासकामी पो.स्टे. मौदा जि. नागपूर यांना देण्यात येते.

सदरची कार्यवाही मा. पोलीस आयुक्त, डॉ. श्री. के. व्यंकटेशम, मा. सह पोलीस आयुक्त, श्री. शिवाजीराव बोडखे, यांचे निर्देशाप्रमाणे मा. पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), श्री. संभाजी कदम, सहाय्यक पोलीस आयुक्त, डॉ. अश्विनी पाटील, गुन्हे शाखा, नागपूर शहर यांचे मार्गदर्शनाखाली पोनि जगवेंद्रसिंग राजपुत, गुन्हे शाखा, युनिट 3, सपोनि ज्ञानेश्वर भेदोडकर, गड्डीमे, शिउरकर, मपोउपनि मंगला मोकाशे, पोहवा शत्रृघ्न कडू, शैलेष ठवरे, अनिल दुबे, राजेश क्षीरसागर नापोशि श्याम कडू, अतुल दवंडे, मिलींद नारसन्ने, चालक फिरोज शेख, व शरीफ शेख सर्व नेमणुक गुन्हे शाखा युनिट 3 यांनी केली आहे.



2) शहरातील नाईट राऊंड अधिकारी बाबत :-

नागपूर शहरात आज दि. 13.02.2018 रोजी मा. पोलीस उप आयुक्त, (परि क्र. 2) श्री. राकेश ओला, हे नाईट राऊंड करणार आहे.

पोलीस जनसंपर्क अधिकारी
नागपूर शहर

## प्रेसनोट

वाहतूक शाखा क्र. 01 चे हद्दीत लक्ष्मीनगर चौक ते माटे चौक (डावी बाजु) पर्यंत रोडचे सिमेन्टीकरणाचे काम अभी इंजिनीयरींग कार्पोरेशन प्रा.लि. या कंपनीव्दारे सहा महिण्यात करण्यात येणार असुन सदरचा मार्ग वाहतूकीचे दृष्टीने अत्यंत वर्दळीचा आहे. सदर मार्गावर वाहतूकीचे नियमन व नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. नमुद मार्गावर वाहतूकीची कोंडी निर्माण होवू नये, तसेच रोडवर गंभीर व प्राणांतिक अपघात होवू नयेत, त्यावर प्रतिबंध व्हावा करीता या दरम्यान रोडवर वाहतूकीचे दृष्टीकोनातुन दिनांक 13/02/2018 अन्वये खालील प्रमाणे अधिसुचना निर्गमित केली आहे.

**लक्ष्मीनगर चौक ते माटे चौक (डावी बाजु)पर्यंतच्या मार्गाचे काम सुरू असतांना वाहतूक खालील प्रमाणे पर्यायी मार्गाने वाहतूक वळविण्यात येईल.**

या मार्गावर असलेल्या रोड दुभाजकाचे उजवी कडील एका बाजुने दुतर्फा वाहतुक जाईल.

**सदर अधिसुचना दि. 12.02.2018 वा. ते 12.03.2018 पर्यत अंमलात राहील.**

तरी नागपूर शहरातील सर्व वाहन चालकांनी या अधिसुचनेचे पालन करून आपली होणारी गैरसोय टाळावी व पोलीसांना सहकार्य करावे.

## प्रेसनोट

ॲटोमोटिव्ह चौक ते जरीपटका चौक (डावी बाजु) या दरम्यान सिमेंट रोडचे काम आर.पी.एस इन्फ्राप्रोजेक्ट्स प्रा. लि. फॉरमरली मे. आर. पी. शहा, नागपूर या कंपनीव्दारे 06 महिण्यात टप्या टप्याने पुर्ण करण्यात येणार आहे. सदरच्या रस्त्यावर दिवसभर व्यस्त वाहतूक असते. करीता नमुद कामाचे दरम्यान वाहतूकीचे नियमन व नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. रस्त्यावर वाहतूकीची कोंडी निर्माण होवू

नये, तसेच रोडवर गंभीर व प्राणांतिक अपघात होवू नयेत, त्यावर प्रतिबंध व्हावा करीता या दरम्यान रोडवर वाहतूकीचे दृष्टीकोनातुन दिनांक 13/02/2018 अन्वये खालील प्रमाणे अधिसुचना निर्गमित केली आहे.

**कपीलनगर चौक ते पॉवर ग्रीड चौक, (डावी बाजु) या मार्गावरील सिंमेट रोडचे काम सुरू करण्यात येणार असुन, या मार्गावरील वाहतूक खालील प्रमाणे वळविण्यात येत आहे.**

**दुसरा टप्पा :– कपीलनगर चौक ते पॉवर ग्रीड चौक** – नमुद रोडवरील वाहतुक सिमेंट रोडचे कामा दरम्यान या मार्गावर अस्थाई रोड दुभाजक निर्माण करून उजवी कडील एका बाजुने जाईल.

**सदर अधिसुचना दि. 12.02.2018 रोजी पासून 12.03.2018 पर्यत अंमलात राहील.**

तरी नागपूर शहरातील सर्व वाहन चालकांनी या अधिसुचनेचे पालन करून आपली होणारी गैरसोय टाळावी व पोलीसांना सहकार्य करावे.

सदर अधिसुचना मा. सह पोलीस आयुक्त, श्री शिवाजी बोडखे, यांच्या आदेशान्वये.